दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
Scan QR code to visit... Epaper Portal
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक ९२ • Title - Code :- MAHMAR49513 • बुधवार दि.२७ डिसेंबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# पत्रकारांना विविध सोई-सुविधा देण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध- उपमुख्यमंत्री अजित पवार

**पुणे :** राज्य शासनाच्यावतीने पत्रकारांना आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजना, शंकरराव चव्हाण सुवर्णमहोत्सवी पत्रकार कल्याण निधीच्या माध्यमातून सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतात; आगामी काळातही पत्रकारांना विविध सोई-सुविधा देण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध राहील, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी दिली.पिंपरी-चिंचवड शहरातील हॉटेल इलेव्हन २३ येथे आयोजित 'पुणे अचिव्हर्स २०२३' या कॉफीटेबल पुस्तकाचे प्रकाशन आणि पुरस्कार वितरण सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंह, माजी आमदार विलास लांडे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, , संघटक संजयजी भोकरे, संघाचे महासचिव डॉ विश्वास आरोटे पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे अध्यक्ष गोविंद वाकडे महाराष्ट्र पत्रकार संघाचे प्रदेश उपाध्यक्ष अध्यक्ष नितीन शिंदे, पिंपरी-चिंचवड शहर कार्यकारिणीचे सदस्य बबन पवार आदी उपस्थित होते.यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे हल्ला विरोधी कृती समितीच्या अध्यक्षपदी गोविंद वाकडे व डिजिटल मिडिया अध्यक्षपदी सिध्दार्थ भोकरे यांची निवड झाल्याबद्दल यावेळी पत्र देऊन ना अजितदादा पवार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.ना.पवार म्हणाले, आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजनेच्या माध्यमातून राज्यातील ज्येष्ठ पत्रकारांचा आदरपूर्वक सन्मान करण्यासाठी, त्याच्या कार्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी त्यांना सन्मानपूर्वक मानधन देण्यात येत आहे. पत्रकारांना दुर्धर आजार, अपघात झाल्यास



किंवा आकस्मिक मृत्यू झाल्यास त्यांना किंवा त्यांच्या कुटुंबियांस शंकरराव चव्हाण सुवर्णमहोत्सवी पत्रकार कल्याण निधीतून मदत करण्यात येते. या निधीसाठी अर्थसंकल्पीय अधिवेशनात ५० कोटी रुपये देण्याची घोषणा करण्यात आली आहे. आता आधीचे ५० कोटी आणि अर्थसंकल्पीय अधिवेशनातील ५० कोटी असे १०० कोटी रुपये झाले आहेत. पत्रकारांच्या मागण्यांबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करुन योग्य तो मार्ग काढण्यात येईल, असेही ते म्हणाले.आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी 'दर्पण'च्या माध्यमातून मराठी पत्रकारितेचा पाया रचला आहे. मराठी पत्रकारितेला निर्भीडता, नि:पक्षपातीपणा आणि लोकाभिमुखतेचा वारसा मिळालेला आहे. राज्य शासनाच्यावतीने घेण्यात आलेले निर्णय, ध्येयधोरणे, उपक्रम नागरिकापर्यंत पोहचविण्याचे काम अतिशय चांगल्याप्रकारे माध्यमांनी केले आहे. संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाअंतर्गत करण्यात आलेली कामे तळागळापर्यंत पोहचविण्याचे माध्यमांनी अतिशय चांगले काम केले. त्यांच्या कार्याची दखल घेऊन शासनाच्यावतीने त्यांचा पुरस्कार देऊन सन्मानही करण्यात आला.सुरुवातीला लोकशिक्षण, ज्ञानप्रसार आणि देशाला स्वातंत्र्य मिळण्याकरीता पत्रकारिता करण्यात येत होती. स्वातंत्र्यपूर्वकाळात ब्रिटीशकालीन चुकीच्या धोरणाविरुद्ध विरोध करण्याचे काम मराठी माध्यमांनी नेटाने केले. मराठी वृत्तपत्रातून समाज घडविण्याचे काम करण्यात आले. त्या काळातील ध्येयनिष्ठ पत्रकारांनी वृत्तपत्र समाज प्रबोधनासाठी, स्वातंत्र्यप्राप्तीसाठी, जनजागृतीसाठी प्रभावी माध्यम असल्याचे दाखवून दिले. आजच्या काळात या गोष्टीचा आदर्श घेऊन काम करण्याची गरज आहे.समाज माध्यमाच्या युगात नागरिकांना जलद बातम्या मिळण्याकरीता पत्रकार काम करीत असतात. चुकीच्या गोष्टीवर टिकाटिप्पणी करणे माध्यमांचा हक्क आहे.पत्रकारांनी चांगल्या गोष्टी समाजापुढे आणण्यासाठी आणि वाईट गोष्टीला रोखण्यासाठी काम करावे. घडलेल्या घटनेचे वार्तांकन करण्यासोबत सामाजिक स्वास्थ जपण्यासाठी वस्तुस्थितीदर्शक बातमी दाखविण्याचे काम माध्यमांनी करावे, असे आवाहन उपमुख्यमंत्री ना.पवार यांनी केले.पुणे अचिव्हर्स २०२३' या कॉफीटेबल पुस्तकाच्या माध्यमातून समाजातील विविध क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या व्यक्तींना समाजापुढे आणण्याचे काम केले आहे. देशाच्या, समाजाच्या प्रगतीत आणि उन्नतीत त्यांचे योगदान आहे. यातून इतरांनीही प्रेरणा घेऊन आपापल्या क्षेत्रात काम करत अपेक्षित उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्रयत्न करावे, असे उपमुख्यमंत्री ना.पवार म्हणाले.श्रीमती चाकणकर म्हणाल्या, बदलत्या युगात प्रवाहाच्याविरुद्ध निर्भीडपणे आणि विवेकबुद्धीला जागृत ठेवून सामाजिक वास्तव्य समाजासमोर आणणे हे खऱ्या पत्रकारितेचे काम आहे. वंचित, दुर्बल अशा घटकांचा आवाज होण्याचे कामही पत्रकारितेने केले आहे. समाजात महिलांवर होणाऱ्या घटना आणि अत्याचार माध्यमांनी समोर आणावे, घडलेल्या घटनेबाबत सतत पाठपुरावा करुन संबंधित पीडिताला न्याय देण्याची भूमिका ठेवावी, असेही श्रीमती चाकणकर म्हणाल्या.ना.मुंडे म्हणाले पिंपरी-चिंचवड या औद्योगिक, ऐतिहासिक, अध्यात्मिक नगरीमध्ये उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करुन त्यांची यशोगाथा कॉफ़ीटेबल पुस्तकाच्या माध्यमातून समाजासमोर आणण्यात आली आहे.प्रास्ताविकात भोकरे म्हणाले, पत्रकारिता क्षेत्रात सामाजिक जाणिव ठेवून पत्रकाराने नेहमी प्रयत्नवादी राहून काम करावे. या माध्यमातून आदर्श पत्रकारितेच्या व्रताचे पालन करावे.यावेळी ना.पवार यांच्या हस्ते साहित्य, कला, क्रीडा, राजकारण, शिक्षण, उद्योग आदी क्षेत्रातील विविध मान्यवरांना 'पुणे अचिव्हर्स २०२३' पुरस्काराचे वितरण करण्यात आले.तर महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे महासचिव डॉ विश्वास आरोटे यांचा शिवरायांची मूर्ती देऊन सत्कार करण्यात आला यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे पश्चिम महाराष्ट्र संपर्क प्रमुख सुभाष डोके. पत्रकार संघाचे ब्रँड अम्बेसेडर संजय फुलसुंदर डॉ स्वामी शिरकुल वैदु महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे वृत्तवाहिनी पुणे जिल्हा अध्यक्ष उपाध्यक्ष अतुल परदेशी पुणे शहर जिल्हा अध्यक्ष राकेश वाघमारे कोल्हापूर जिल्हा अध्यक्ष बाजीराव फराकटे जेष्ठ पत्रकार ज्ञानेश्वर नवले यांसह पदाधिकारी उपस्थित होते आभार प्रदर्शन नितीन शिंदे यांनी मानले

# प्रेमाच्या नावाखाली होतेय युवतींची फसवणूक!

**मूल । प्रतिनिधी**

प्रेमाच्या नावाखाली अल्पवयीन विद्यार्थिनींसह युवतींची फसवणूक होण्याचे प्रकार शहरासह ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात वाढले असून पालकांनी जागृत होण्याची वेळ आली आहे.प्रेमाच्या नावाखाली अल्पवयीन विद्यार्थिनीसह युवतीचे शारीरिक शोषण करून त्यांचे जीवन उध्वस्त करण्याचे प्रकार अलीकडे मोठ्या संख्येने धडत आहेत आणि प्रेमभंगाच्या निराशेतून युवतींच्या आणि विद्यार्थीनींच्या आत्महत्याही वाढत असल्याने पालकांमध्ये भीती आणी चिंता निर्माण झाल्याचे दिसून येते.घरातून शाळेत गेलेली मुलगी शाळेतून सुखरूप परत येईल,याची शाश्वतीही आजच्या पालकांना राहिली नाही.अशा घटनांना आळा घालण्यासाठी आणी विद्यार्थिनींना वाममार्गापासून वाचवण्यासाठी पालकांनीच जागृत होणे गरजेचे आहे.



टवाळखोर युवक शालेय विदयार्थ्यांनींना विविध आमीषे देऊन गळाला लावतात.प्रेमाचे नाटक रचतात,हळूहळू विश्वास संपादन केले की तिच्या कडून शारीरिक सुखाची अपेक्षा करतात.एखाद्या युवतीकडून शारीरिक सुखाची अपेक्षा पूर्ण झाली नाही तर तिची हत्या करणे,मारहाण करणे,ठिकठिकाणी छळ करणे असे प्रकार सुरु असल्याचे चित्र आहे.तर काही प्रसंगी शारीरिक सुख मिळताच तिला सोडून देण्याचे प्रकार घडत आहे.त्यामुळे निराश होऊन विद्यार्थिनी आत्महत्यासारखे पाऊल उचलत आहे.ठिकठिकाणी अल्पवयीन विद्यार्थिनीच्या आणी युवतींच्या आत्महत्यांच्या घटना घडत आहेत.यातील बहुतांश घटनांचे मूळ कारण प्रेमप्रकरण असल्याचे दिसते.अशा प्रकरणात मुलींचे जीवन उध्वस्त होत असून अशा प्रकारांना आळा घालण्याचे आव्हान सामाजिक संघटना आणि पालकांसमोर आहे. शाळेच्या नावावर घराबाहेर पडलेल्या अनेक विद्यार्थिनी इतरत्र युवकांसमोर भटकताना दिसून येतात.त्यामुळे पालकांनीच आता खबरदारी घेऊन पाल्यांच्या हालचालीकडे लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे. शहरातील बाग बगिचे,रिकामे रस्ते ग्रामीण भागातील निर्मनुष्य परिसर अशा जोडप्यांनी फुललेले नेहमीच चित्र राहिले आहे. फेसबुक, यूट्यूब, मोबाईल यामुळे युवक-युवतींमधील सपर्क दिवसेंदिवस वाढत असून अनेकदा ऑनलाईन प्रेमप्रकरणे उजेडात आली आहेत. कोणाची काहीही ओळख नसतांना मोबाईलवर प्रेमप्रकरणे फुलल्याची अनेक उदाहरणे शहरी आणी ग्रामीण परिसरात दिसून येतात. त्यामुळे अशा प्रकारांवर निर्बंध घालण्यासाठी पालकांसोबतच नागरिक, सामाजिक संघटनांना पुढाकार घ्यावा लागणार आहे.

# एन.डी.आर.एफ.च्या चमू कडून विद्यार्थ्यांनी समजून घेतले आपत्ती व्यवस्थापनाचे कौशल्य

**गडचिरोली । प्रतिनिधी**

गोंडवाना विद्यापीठाच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन शिबिर 'आव्हान २०२३' चे उद्घाटन पार पडले. उदघाटन कार्यक्रमानंतर राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या(महाराष्ट्र) चमु ने राज्यभरातील विद्यापीठातुन आलेल्या विद्यार्थ्यांना एन. डी. आर. एफ. ची प्राथमिक माहिती दिली.चार वेगवेगळ्या ठिकाणी या प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. एन. डी.आर. एफ. ची स्थापना कशासाठी करण्यात आली, त्याचे कार्य काय, कशा प्रकारे हे कार्य केले जाते, कुठल्या आपत्ती मध्ये कशा प्रकारे मदत केली जाते .याची विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. एन.डी.आर. एफ. च्या महाराष्ट्र चमूने ने ही माहिती विद्यार्थ्यांना दिली. यावेळी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे सुद्धा एन. डी.आर. एफ. च्या चमूने दिली. आजपासून प्रत्यक्ष प्रशिक्षण वर्गाला सुरवात झाली.शहरातील सुमानंद , गांडली, सुप्रभात सभागृह, शासकीय विज्ञान महाविद्यालय येथे विविध



विद्यापीठातून आलेल्या विद्यार्थ्यांची सोय करण्यात आली आहे. आज या चारही ठिकाणी एन. डी.आर. एफ. च्या चमूने प्रशिक्षण दिले. यामध्ये सकाळी पी. टी. आणि योगाचे प्रशिक्षण देण्यात आले.त्यानंतर 'आपत्ती व्यवस्थापन 'या विषयावर सिनियर इन्स्पेक्टर एन. डी.आर. एफ. कृपाल मुळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कुठल्याही नैसर्गिक आपत्तीच्या वेळी 'हृदयाला पुनर्जीवित कसं करायचं' आणि ऑक्सीजन थेरपी या विषयावर हेड कॉन्स्टेबल एन. डी.आर. एफ. गणेश देशमुख यांनी पी. पी. टी. व्दारे माहिती दिली. तसेच याच विषयावर प्रात्याक्षिक कॉन्स्टेबल एन. डी.आर. एफ. सदाशिव जायभाये यांनी दिले.शासकीय विज्ञान महाविद्यालयात पार पडलेल्या या प्रशिक्षण वर्गात विद्यार्थ्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत त्यांना पडलेल्या अनेक प्रश्नांचे निरसन एन. डी.आर. एफ.अधिकाऱ्यांनी केले. आपत्तीच्या समयी समयसूचकता राखून कशी काळजी घेता येईल हे जाणून घेण्यासाठी विद्यार्थी प्रचंड उत्साही होते.

# सामाजिक कार्याची परंपरा जोपासावी-खा.अशोक नेते

**गडचिरोली । प्रतिनिधी**

आज भगवान दतात्रेय ब्रम्हा, विष्णू आणि महेश या तिन्ही देवांच्या अवताराने दत्त जयंतीचे औचित्य साधुन गडचिरोली जिल्हा मध्यवर्ती को-ऑपरेटिव्ह सहकारी बँकेच्या वतीने यशवंतराव चव्हाण आदर्श लोकप्रतिनिधी पुरस्कार प्राप्त आमदार कृष्णा गजबे यांचे अभिनंदनपर व वाघाच्या हल्ल्यात मृत्यू पावलेल्या इसमाच्या कुटूंबियांना मदतीचा हात या कार्यक्रमाचे आयोजन दि गडचिरोली जिल्हा मध्यवर्ती को-ऑपरेटिव्ह सहकारी बँकेच्या प्रांगणात आयोजित करण्यात आले.

कार्यक्रमाप्रसंगी खासदार अशोक नेते यांनी बोलतांना पोरड्डीवार परिवार हा नेहमीच सामाजिक कार्याचे उपक्रम घेत असतो. सामाजिक कार्याची जाणीव ठेवून सामाजिक कार्याची परंपरा जोपासून हा उपक्रम या ठिकाणी आयोजित केला त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करून कौतुक करतो. वाघाच्या हल्ल्यात मृत्यू पावलेल्या कुटुंबियांना एक मदतीचा आधार व त्यांच्या दुःखात सामील होऊन त्यांचा दुःख हलके करण्याचा व वाटून घेत त्या कुटुंबियांना आर्थिक मदत दिली.अतिशय चांगला कौतुकास्पद कार्यक्रम आयोजित केला. त्याबद्दल मी त्यांचं धन्यवाद व मनापासून आभार व्यक्त करतो. तसेच संयमी, शांत प्रेमळ स्वभावाचे धनी,चांगले व्यक्तिमत्व असलेले आरमोरी विधानसभा क्षेत्राचे आमदार कृष्णा गजबे यांना यशवंतराव चव्हाण आदर्श लोकप्रतिनिधी , पुरस्काराने सन्मानित करण्यात आले त्यांचंही सुद्धा



याप्रसंगी अभिनंदन करतो.आज प्रंचित सा.पोरड्डीवार यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने उदंड आयुष्याच्या शुभेच्छा व समस्त जनतेला दत्त जयंतीच्या शुभेच्छा देतो असे प्रतिपादन याप्रसंगी खासदार अशोक नेते यांनी केले.यावेळी मंचावर प्रामुख्याने आमदार रामदास आंबटकर वि.प.सदस्य,सहकार महर्षी अरविंद साव.पोरेड्डीवार, सहकार नेते प्रकाश साव. पोरेड्डीवार,आमदार कृष्णाजी गजबे,भाजपा जिल्हाध्यक्ष प्रशांत वाघरे, अध्यक्ष जी डी सी सी बँक गडचिरोली चे प्रंचित साव. पोरेड्डीवार, उपाध्यक्ष श्रीहरी भंडारीवार,मानद सचिव अनंत साळवे,नगराध्यक्ष पवन नारनवरे,कृ.उ.बा.स. आरमोरी सभापती ईश्वर पासेवार, कृ.उ.बा.स.गडचिरोली सभापती शशिकांत साळवे, भाजपा ओबीसी जिल्हाध्यक्ष अनिल पोहनकर,डॉ.अप्पलवार तसेच मोठया संख्येने नागरिक उपस्थित होते.

# आ.प्रतिभा धानोरकर यांच्या हस्ते मोरवाहीत कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील मुल तालुक्यातील मोरवाही येथे युवा बजरंग क्रिडा मंडळाच्या वतीने दिवगंत खासदार बाळूभाऊ धानोरकर यांच्या स्मृती प्रित्यर्थ भव्य कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ही स्पर्धा दि. २५ ते २८ डिसेंबर २०२३ या कालावधीत होत आहे.

या स्पर्धेत एक गाव एक संघ या तत्त्वावर खेळाडूंना सहभागी होण्याची संधी देण्यात आली. स्पर्धेसाठी जिल्ह्यातील सर्व गावांमधून खेळाडूंची निवड करण्यात आली.स्पर्धेचे उद्घाटन सोमवार, दि. २५ डिसेंबर रोजी सायंकाळी ४ वाजता झाले. या उद्घाटन सोहळ्याचे उद्घाटन आमदार प्रतिभा धानोरकर यांनी केले. यावेळी महाराष्ट्र प्रदेश महासचिव विनोद दत्तात्रय, जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष विनोद अहिरकर, पोंभुर्णा कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती तथा तालुका कँग्रेस अध्यक्ष



रवी मारपल्लीवार, वैशाली पुल्लावार, अशोक पुल्लावार, आशिष अहिरकर, सुधाकर भिवनकर, गोविंदा रोहणकर, साईनाथ गेडेकर, सरपंच अनुराधा नेवारे, झरकर यांची उपस्थिती होती. उद्घाटन सोहळ्यात आमदार प्रतिभा धानोरकर यांनी खेळाडूंना मार्गदर्शन केले. त्यांनी खेळाडूंना प्रामाणिकपणे खेळण्याचा सल्ला दिला. त्यांनी खेळातून हार-जीत हा स्वाभाविक भाग असल्याचे सांगितले. खेळातून शिकणे आणि वाढणे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.या स्पर्धेत जिल्ह्यातील १५ गावांमधील संघांनी भाग घेतला. स्पर्धेचे सामने अतिशय चुरशीचे होत आहे. या स्पर्धेसाठी प्रथम क्रमांकाचे पारितोषिक आमदार प्रतिभाताई धानोरकर यांच्या तर्फे देण्यात आहे. तसेच खासदार बाळूभाऊ धानोरकर मित्र परिवार चॅरिटेबल सोसायटी तर्फे प्रथम, द्वितीय व तृतीय विजेत्यांना स्मृती चिन्ह (शिल्ड ) देण्यात आले आहे. स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यासाठी युवा बजरंग क्रिडा मंडळाच्या वतीने सर्वतोपरी प्रयत्न केले . या स्पर्धेमुळे मोरवाहीत कबड्डी खेळाला चालना मिळेल आणि तरुण खेळाडूंना स्पर्धा करण्याची संधी मिळेल अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

# २३ दिवसापासून अंगणवाडी सेविकांचा तहसील समोर ठीया आंदोलन

**मूल । प्रतिनिधी**

अंगणवाडी सेविकांना पेन्शन लागू करावे यासह अन्य मागण्यांना घेऊन २३ दिवसापासून ठिय्या आंदोलन करण्यात आले. आंदोलनात शेकडो अंगणवाडीसेविका मदतनीस सहभागी झाल्या. अंगणवाडी सेविकांना पेन्शन लागू करा, कोरोना प्रोत्साहन भत्ता देण्यात यावा, सर्वोच न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करून अंगणवाडीसेविकांना ग्रॅज्युएटी लागू करावी, अंगणवाडीसेविकांच्या रिक्त जागा भराव्या, सेवानिवृत्तीचा लाभ द्यावा, फसवेगिरी बंद करा अशा घोषणा यावेळी करण्यात आल्या.४ डिसेंबरपासून राज्यातील अंगणवाडी कर्मचारी बेमुदत संपावर आहेत. अंगणवाडी सेविकांना पेन्शन लागू करावे यासह अन्य मागण्यांना घेऊन मागील २३ दिवसापासून महिला रस्त्यावर आहे. मागण्या पूर्ण झाल्याशिवाय आंदोलन मागे घेणार नाही असा निर्धार या महिलांनी केला आहे.

# आमचे श्रद्धास्थान साठगांवचे श्रीदत्तात्रेय प्रभू मंदिर व यात्रा महोत्सव

चंद्रपूर, नागपूर व भंडारा या तिन्ही जिल्ह्याच्या सीमा हद्दीवर वसलेलं तथा चिमूर-कांपा-नागपूर मार्गावरील शंकरपूर, कांपा, भुयार, निलजफाटा व भिवापूर या गावापासून ७ ते ८ कि. मी. अंतरावर आड बाजूस असलेल छोटस गांव साठगाव. एकेकाळी साठ घराची वस्ती असलेल नी आता अंदाजे १८०० ते २००० लोकसंख्या असणारं हे गाव भोसलेकालीन काळात काही नैसर्गीक आपत्ती व पेंढारी (लुटारू) यांच्या लुटीत पूर्णपणे उध्वस्त झाले होते. या गावाचे आकर्षण म्हणजे आज गावालगतच्या टेकडीवर उभे असलेल श्रीदत्तात्रेय प्रभूचे भव्य पुरातन मंदिर.

याबाबत थोडक्यात असे कि, इ.स. १७८५ मध्ये चांदापूर (जी.चांदा) राजे भोसले यांचेशी इंग्रजाच्या लढाईचा उल्लेख महानुभाव ग्रंथामध्ये आला आहे. त्यावेळी माहूर संस्थान मधून भोसलेकालीन राज्याचा कारभार पहिला जात असे. त्याकाळात राजे भोसले यांचेकडून विजयी सेनाप्रमुख गावंडे कुटुंबातील पराक्रमी व्यक्तीला परागणे 'साठगाव' चिमूर हा भाग मालगूजारीत मिळाला. गावंडे कुटुंब मुळ यवतमाळ जिल्ह्यातील दिग्रस गावचे यांचा माहूर संस्थानशी पूर्वीपासून सबंध होता.

गावंडे कुटुंब साठगावला मालगुजार म्हणून स्थाईक झाले व त्यांनी श्रीदत्तात्रेय प्रभू यांचे निद्रास्थान देवदेवेश्वरी संस्थान, माहूर येथे खाचर बैलाने देवदर्शानाकरिता माहुरवारी सुरु केली. पूर्वीच्याकाळी तीर्थयात्रेवरून परत आल्यानंतर गावाचे शिवेवर किंवा मंदिरात एक रात्र मुक्काम केल्या जात असे. अशाच एका वारीमध्ये मालगुजार गावंडेपाटील यांनी सुध्दा त्याकाळी गावापासून दूर असलेल्या टेकडीवर मुक्काम केला असता त्यांना स्वप्न पडले मी तुझे सोबत आहे. याच स्थळी माझी पुजेची व्यवस्था कर या गावाचे भाग्य उदयास येईल. तेथे पाहणी केली असता 'सर्वतीर्थ' माहूर येथील विशेष असल्याचे दिसले. तेव्हापासून झोपडीवजा मंदिरात विशेषाची स्थापना करून त्रिकाळ पूजाअर्चा सुरु केली असून आजही नित्यक्रमाने सुरु आहे.


गावंडे कुटुंबाचे स्वप्न साकार झाल्यानंतर इ.स. १८६४ मध्ये श्रीमती राधाबाई धर्माजीपाटील गावंडे यांनी साठगाव येथे श्रीदत्तात्रेय प्रभू मंदिराचे बांधकाम सुरु केले व तेव्हापासून येथे तीन दिवसीय श्रीदत्तजयंती यात्रा महोत्सव सुरु झालेला असून आता श्रीदत्तजयंती यात्रा महोत्सव दोन दिवसाचा करण्यात आलेला आहे. राधाबाईने माहूरवारी बंद करून गोंदिया जिल्ह्यातील डाकराम-सुकळी (चक्रधर स्वामीचे चरणाकिंत स्थान) येथील वारी सुरु केली ती आजही सुरु आहे. राधाबाई नंतर त्यांचा मुलगा कवडूजीपाटील यांनी तर त्यानंतर रामचंद्रजी, हरिचंद्रजी, देविदासजी व उमेशजीपाटील यांनीही श्रीदत्तजयंती यात्रेचा वारसा जोपासला असून आजही पुढील पिढीकडून हे कार्य सुरु आहे. न्यास नोंदणी नंतर अध्यक्ष म्हणून कै.कवडूजी धर्माजीपाटील गावंडे, कै.रामचंद्र कवडूजीपाटील गावंडे व श्रीमती





लीलाबाई रामचंद्रपाटील गावंडे यांनी कार्यभार सांभाळलेला आहे.

सन १९८० मध्ये कवडूजीपाटील यांनी कै.म. जयकृष्णबाबा दर्यापूरकर (वणी) यांचेकडून संन्यास दिक्षा घेतली व त्यानंतर ते साठगाव येथिल श्रीदत्त मंदिरात वास्तव्यास राहू लागले. त्यांच्या पत्नी कासुबाई व मुलगी शेवंताबाई ह्या सुध्दा वृद्धापकाळात मंदिरात वास्तव्यास होत्या. तसेच देवदेवेश्वरी संस्थान, माहूर चे विद्यमान पिठाधीश महंत श्री माहुरकरबाबा उर्फ मधुकर शास्त्री कवीश्वर हे पंधरा वर्षे, महंत सुधाकरबाबा संन्याशी (उमरखेड) हे दोन वर्षे व कै.त.भागुबाई पातुरकर (मनसळ) ह्या बारा वर्षे साठगाव येथिल श्रीदत्त मंदिरात वास्तव्यास होत्या.



विनोद रामचंद्र गावंडे
९८२२३६६१६५

या पुरातन महानुभाव श्रीदत्तात्रेय प्रभू मंदिराची उभारणी चुनखडी मिश्रित विटांनी करण्यात आली असून समोरील सभामंडप नंतर बांधून दिलेला आहे. श्रीदत्तात्रेय प्रभूच्या विशेषावर अत्यंतवेधक व कलाकुसरयुक्त चांदीचा मुखवटा बसविला आहे. लाकडी रथावरील नक्षीकाम उत्कृष्ट कलेचा नमुना असून हा लाकडी रथ साठगाव येथील कै.राखुंडे परिवार यांनी तयार केला आहे. साठगाव येथील श्रीदत्तप्रभूची महिमा पंचक्रोशीत असून चैत्र पौर्णिमा, आषाढी पौर्णिमा, नारळी पौर्णिमेस भाविक मंडळी बहु संख्येने पूजाअर्चा करण्याकरिता येत असतात. काही भक्तगण पाच दिवसापासून तर सव्वा महिन्यापर्यंत धरणे (वास्तव्यास) असतात. नवरात्रामध्ये सदभक्ताकडून येथे नउ दिवस पंगती असतात. मार्गशीर्ष महिन्यात भक्तजन सहभोजनाकरिता येत असतात.

मार्गशीर्ष पौर्णिमेपासून येथे श्रीदत्तजयंती यात्रा महोत्सव असते. प्रथम दिवशी सकाळी श्रीदत्तप्रभूचा जन्मोत्सव, ध्वजारोहण साजरा करण्यात येते तर सायंकाळी बँड व भजनाच्या गजरात तर श्रीदत्तप्रभूचे नामघोषात विशेषाची रथशोभा यात्रा काढण्यात येते. गावामध्ये या रथशोभा यात्रेचे ठीकठिकाणी स्वागत करून विशेषास विडाअवसर व उपहार समर्पण करीत असतात. तर गावातील काही सद्भक्त मंडळी रथशोभा यात्रेनिमित्य नास्ता, अल्पोपहार, चहापान व फळांचे वाटप करीत असतात. दुस-या दिवशी (मार्गशीर्ष प्रतिपदा) भजन, प्रवचन, कीर्तन, दहीहंडी, गोपाळकाला व महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते. तर गावातील युवक मंडळी यात्रेनिमित्य आरोग्य शिबीर, रक्तदान शिबीर, मैदानी खेळ व नाटकाचे आयोजन करीत असतात.

वंदनिय राष्ट्रसंत तुकडोजीबाबा यांचा भजनाचा कार्यक्रम सन १९६१ ला साठगाव येथे जि.प. प्राथमिक शाळेच्या उदघाटन प्रसंगी झाला असून त्यावेळी त्यांनी आयुर्वेदाचार्य डॉं.भैरवारदादा सह श्रीदत्तमंदिरास भेट देवून दर्शन घेतले. मध्यंतरीच्या काळात महानुभाव पंथीयांची पालखी यात्रा श्रीक्षेत्र रीद्धपूर येथील यक्षदेव मठातील कै.आचार्य म.मुरारीमल्लबाबा व कै.म.प्रभाकरशास्त्री यक्षदेव त्याचप्रमाणे कै.म.गोपिराजबाबा (जुने) तर सन २००२ मध्ये म.विद्याधरदादा पंजाबी (वाघोदा) हे मार्ग मंडळीसह साठगाव येथील श्रीदत्त मंदिरात धर्म प्रचारासाठी आलेले होते. सन २०२२ मध्ये जाधववाडी येथील आचार्य मोठेबाबा मार्ग मंडळीसह पुयारदंड, त.भिसी येथे वास्तव्यास आले असताना साठगाव येथील श्रीदत्त मंदिरात दर्शनाकरिता आले होते.

तसेच म.श्री. नागराजबाबा उर्फ गोपिराजबाबा शास्त्री (रीद्धपूर), म.श्री.न्यायबांसबाबा उर्फ सैंगराज शास्त्री (मकरधोकडा), साहित्याचार्य म.श्री.बा.भो.शास्त्री (करमाड), म.श्री.एकोबासबाबा उर्फ वसंतराज शास्त्री (खुटाळा चंद्रपूर), म.श्री.मुधोव्यासबाबा उर्फ संजयराज शास्त्री (एकार्जुना वरोरा), म.श्री.परसराजबाबा उर्फ संतोषराज शास्त्री (वणी), म.श्री.कळमकरबाबा (गाढेजळगाव), म.श्री.दत्तराजबाबा शेवलीकर (सोलापूर), म.श्री.प्रभाकारदादा कपाटे (भोकर), म.श्री.सायराजदादा पुजदेकर (नाशिक), म.श्री.गोविंदराजदादा बिडकर (लातूर), म.श्री.निर्मलमुनी बाभूळगावकर (जालीचादेव), म.श्री.उध्दवराज दिवाकरबाबा (लोणारा भद्रावती), म.श्री.देपेराजबाबा (नागपुर), म.श्री.कृष्णामुनी (रीद्धपूर), म.श्री.वंकीराजदादा अस्टूणकर (डाकराम सुकळी), म.श्री.कान्हेराजदादा (काटोल), म.श्री.संजयदादा भोजने (जालीचादेव), म.श्री.योगीराजदादा (हदगाव), त.पुष्पाताई विराट (मकरधोकडा), त.डॉं.मालतिताई बिडकर, त.विमलताई शेवलीकर (विठ्ठलवाडी नागपूर), त.विमलताई शीवनेकर (दहेगाव), किर्तनकार श्री.दामोधरशाहीर वाजीरगावकर (नांदेड), श्री.दादाराव उके (नेर), म.बिडकरबाबा (सातारा), म.माधव्यासबाबा (सालबर्डी), श्री मनोहर फाये, श्री दुलीचंद तुरकर, श्री अमर ठमके, योगेश कपाटे, श्री सुरेशभाऊ वाईन्देशकर, ह.भ.प.श्री पंजाबराव अंभोरे, ह.भ.प.चांगदेवदादा (सालोरी), ह.भ.प. नामदेवदादा (टाका), कै.म.राजेन्द्रप्रसाद शेवलीकर उर्फ म.सुगावकर (बदनापूर), कै.म. अशोकशास्त्री माहुरकर (माहुर), कै.म. दयालमुनी अन्कुलनेरकर (वडवाडी, पैठण), कै.म.चक्रपानीबाबा (मौदा), कै.म.शिवनेकरबाबा (दहेगाव), कै.म.विलासशास्त्री (वणी), कै.म.नागापुरकरबाबा (चिंचभूवन), राष्ट्रीय किर्तनकार कै.म.कपाटेबुवा, कै.म.यादोबुवा (टाका), कै.म.श्यामसुंदरशास्त्री (नागपूर) कै.म.श्रावणबुवा (साठगाव), कै.माणिकलाल बारसागडे, समाजसेविका शकुंतलाबाई कपाटे, आदींनी श्रीदत्त जयंती यात्रा महोत्सवानिमित्य उपस्थित राहून प्रवचन, किर्तन, भजन यामधून महानुभाव पंथाचे तत्वज्ञान, व्यसनमुक्ती, अंधश्रद्धा, अहिंसा, आत्महत्या, बुवाबाजी, कर्मकांड, स्वच्छता अभियान, समाजप्रबोधन याबाबत जनजागृती केलेली आहे. त्याचप्रमाणे देशभक्त वामनराव गावंडे, कै.माजी खासदार नामदेवराव दिवटे, कै.माजी विधानसभा उपाध्यक्ष मो.वी.टेमुर्डे, कै.माजी आमदार मेश्राम साहेब, कै.माजी आमदार वसंतराव इटकेलवार, माजी राज्यमंत्री डॉं.रमेश गजभे, माजी आमदार डॉं.अविनाश वारजूकर, माजी आमदार सुधीर पारवे, जागतिक कृशीतज्ञ डॉं.रमेश ठाकरे, माजी कुलगुरू वाय.एम.टाले, न्युरो सर्जन डॉं. मिलिंद देवगावकर, डॉं.शैलेजा देवगावकर, कै.डॉं.रा.बो.मेश्राम, कै.डॉ.तू.वी.गेडाम, माजी जि.प.अध्यक्ष संतोष रावत, माजी जि.प.अध्यक्ष डॉं.सतीश वारजूकर, माजी जि.प.अध्यक्ष संतोष कुमरे, श्री सुधाकरराव मेंघर, साजन शेंडे, प्रा.बी.जी.रडे, पु.वा.स्वान, बालाजी मंदिर चिमूर चे माजी अध्यक्ष ॲड बोथले, सर्वज्ञ विचारमंच तळोधी आदी मान्यवर मंडळी यांनी यात्रेनिमित्य सदिच्छ! भेटी दिलेल्या आहेत.

या मंदिरास तिर्थक्षेत्राचा क वर्ग दर्जा प्राप्त असून तिर्थक्षेत्र विकास निधी योजनेअंतर्गत सभामंडप, धर्मशाळा, स्वच्छतागृह, पाण्याची छोटी टाकी, पेव्हिंग ब्लाक फिटिंग, संरक्षण भिंत इ. कामे करण्यात आलेले आहेत. तसेच अर्धवट, संरक्षण भिंतीचे काम, मंदिरामागील गावाला जोडणारा अंदाजे २५० मीटरचा रस्ता पथदिव्यासह करने अत्यंत गरजेचे आहे. सदर पुरातन मंदिराचे आतील भागाचे नुतनीकरण महंत श्री माहुरकरबाबा उर्फ मधुकरशास्त्री कवीश्वर यांचे आशीर्वादाने, विनोद रामचंद्र गावंडे यांचे पुढाकाराने, सदभक्त व आप्तेष्ट मंडळी यांचे सहकार्याने पूर्ण केले असून मंदिराचे बाहेरील भागाचे नुतनीकरण करणे आवश्यक आहे.

सर्व गावकरी तथा परिसरातील सदभक्त व आप्तेष्ट मंडळी यांचे अपार श्रध्दा व स्नेहाने गावंडे परिवार श्रीदत्तात्रेय प्रभू मंदिर साठगाव येथिल श्रीदत्तात्रेय प्रभू जयंती यात्रा महोत्सव आजही मोठ्या उत्साहाने साजरा करतात. आणि सदभक्त मंडळी मोठ्या संख्येने येथे येवून श्रीदत्तप्रभू चरणी लीन होतात.

## २७ डिसेंबरला ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक रात्री १२ पर्यंत वापरासाठी मुभा

### राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेनिमित्त विशेष सवलत

**चंद्रपूर**–६७ व्या राष्ट्रीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धेचा उद्घाटन सोहळा व इतर सांस्कृतिक कार्यक्रमानिमित्त दिनांक २७ डिसेंबर रोजी ध्वनिक्षेपक व ध्वनीवर्धकाचा सकाळी ६ वाजेपासून ते रात्री १२ वाजेपर्यंत वापर करण्यास जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी आज एका आदेशान्वये चंद्रपूर जिल्ह्याकरिता सवलत देण्यात येत असल्याचे आदेश निर्गमित केले आहे. चंद्रपूर जिल्ह्याकरीता सन-२०२३ मधील राखीव सवलतीच्या दिवसातून ही सवलत मंजूर करण्यात आली आहे. निश्चित करण्यात आलेल्या सवलतीच्या दिवशी सक्षम प्राधिकाऱ्यांकडून परवानगी घेऊन व त्यांनी ठरवून दिलेल्या अटी व शर्ती प्रमाणेच ध्वनिक्षेपक व ध्वनीवर्धकाचा वापर करता येईल, असेही जिल्हा दंडाधिकारी यांचे आदेशात नमूद आहे.

## दिव्यांग व्यक्तींकरिता फिरत्या वाहनावरील दुकान योजनेचा लाभ घेण्यासाठी ४ जानेवारीपुर्वी करा अर्ज

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

दिव्यांग व्यक्तींना स्वावलंबी करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळाच्या माध्यमातून हरीत उर्जेवर चालणाऱ्या पर्यावरणस्नेही फिरत्या वाहनावरील दुकान (मोबाईल शॉप ऑन ई-व्हेईकल) उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यासाठी https://evehicleform.mshfdc.co.in/ या संकेतस्थळावर ४ जानेवारी २०२४ सकाळी १० वाजेपर्यंत नोंदणी करण्याचे आवाहन महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक यांनी केले आहे.या योजनेचा उद्देश दिव्यांग व्यक्तींना पुरेशा सोयी-सुविधा उपलब्ध करून रोजगार निर्मितीस चालना देणे, त्यांचे आर्थिक व सामाजिक पुनर्वसन करून कुटूंबासमवेत जीवन जगण्यास सक्षम करणे असा आहे.योजनेच्या अटी व शर्तीनुसार अर्जदार हा १८ ते ५५ वयोगटातील महाराष्ट्र राज्याचा रहीवासी असावा, दिव्यांगत्वाचे प्रमाण किमान ४० टक्के असावे व तसे जिल्हा शल्य चिकित्सक अथवा सक्षम प्राधिकारी यांनी प्रमाणित केले असावे. अर्जदाराकडे दिव्यांगत्वाचे युडीआयडी प्रमाणपत्र असणे बंधनकारक आहे. मतिमंद अर्जदाराच्या बाबतीत त्यांचे कायदेशीर पालक अर्ज करण्यास सक्षम असतील. दिव्यांग अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न रुपये २ लाख ५० हजार पेक्षा अधिक नसावे. लाभार्थी निवड करतांना जास्त दिव्यांगत्व असलेल्यास प्रथम प्राधान्य दिले जाईल. अतितीव्र दिव्यांगत्व असणाऱ्या दिव्यांग व्यक्तीस वाहन चालविण्याचा परवाना नाकारला असल्यास अशा परिस्थितीत देखील परवानाधारक नसलेल्या अतितीव्र दिव्यांग व्यक्तीच्या बाबतीत सोबत्याच्या सहाय्याने फिरत्या वाहनावरील व्यवसाय करण्यास प्राधान्य दिले जाईल. अर्जदाराने सर्व अटी मान्य असल्याचे तसेच संबंधीत वाहनाची योग्य ती काळजी घेण्याचे बंधपत्र सादर करणे आवश्यक राहील. अर्जदार शासकीय, निमशासकीय, मंडळे अथवा महामंडळाचा कर्मचारी नसावा. तसेच दिव्यांग वित्त व विकास महामंडळाच्या कर्जाचा थकबाकीदार नसावा. राज्यातील इतर कोणत्याही योजनेंतर्गत मोफत ई-वाहन प्राप्त झालेले दिव्यांग लाभार्थी सदर योजनेसाठी पात्र राहणार नाहीत. अधिक माहितीकरिता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथील दिव्यांग वित्त व विकास महामंडळाच्या जिल्हा कार्यालयात संपर्क करावा.

## आत्महत्यामुक्त शेतकऱ्यांच्या घोषणा हवेतच विरल्या : विरोधी पक्षनेते अंबादास दानवे

**मुंबई**–गेल्या ४८ तासांत दुष्काळ, सततची नापिकी याने त्रस्त ६ शेतकऱ्यांनी यवतमाळ जिल्ह्यात आत्महत्या केल्या आहेत. सरकार सत्तेत आल्यापासून आत्महत्यामुक्त महाराष्ट्र करण्याच्या घोषणा करत आहेत. मात्र वाढत्या शेतकरी आत्महत्येच्या घटना पाहता सरकारने केलेल्या घोषणा या घोषणाच राहिल्या असून त्या हवेत विरल्याची टीका विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केली.कोरोनाच्या नव्या व्हेरियंटचे ठाण्यात रुग्ण सापडले असून वाढती कोरोना रुग्णांची संख्या पाहता सरकारने यावर प्रतिबंधात्मक कोणत्याही उपाययोजना केल्या नाहीत, असे दानवे म्हणाले. अवकाळी पाऊसाच्या नुकसान भरपाईची मदत अद्याप शेतकऱ्यांना मिळाली नाही. सरकारने जाहिरातीद्वारे प्रसिध्द केलेले आकडे हे कागदावरच राहिले आहेत.मुख्यमंत्री यांच्या ठाणे जिल्ह्यात कुपोषणाचा दर उंचावला आहे. शासन



आपल्या दारी की कंत्राटदार, उद्योग दारांच्या दारी असा टोला दानवे यांनी लगावला.

शेतकरी आत्महत्या, कुपोषण रोखण्यास हे सरकार अपयशी ठरल्याची टीकाही विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केली.उद्योग विभागाने आज विविध वर्तमानपत्रात दिलेल्या जाहिरांतीवर प्रतिक्रिया देताना दानवे म्हणाले की, एखाद्या कंपनीसोबत करार केला म्हणजे गुंतवणूक झाली असे होत नाही. विश्वगुरु म्हणून मिरवणारा भाजप जनतेचे प्रश्न सोडविण्यात स्पशेल अपयशी ठरला आहे, म्हणून सध्या ते राम मंदिराच्या मुद्द्यावर भाजप भावनिक फुंकर घालून राजकारण करत आहेत, अशी टीका दानवे यांनी केली. तर इंडिया आघाडी भ्रष्टाचार, बेरोजगारी, महागाई यावर निवडणूका लढणार असल्याचे दानवे म्हणाले. शिंदे गटातील अनेक खासदार हे भाजपच्या चिन्हावर लढणार आहेत. त्या उमेदवारांना भाजप गिळून टाकणार अशी प्रतिक्रिया दानवे यांनी शिंदे गटाच्या खासदारांच्या निवडणुक लढवण्यावर दिली.

## शिंदे गटाप्रमाणे आम्हालाही तितक्याच जागा मिळाव्यात:अजितदादा गटाचे मंत्री छगन भुजबळ

**मुंबई**–अजित पवार हे आमच्या पक्षाचे प्रमुख आहेत. त्यामुळे जागा-वाटपात त्यांनी त्यांचे मत मांडले आहे. जवळपास शिंदे गटाचे जितके आमदार आले आहेत, तेवढेच अजित पवार गटाचे आमदार आलेले आहेत. त्यामुळे सारासर विचार करता त्यांच्याप्रमाणेच आम्हालाही न्याय मिळायला पाहिजे, असे मत मांडले तर ते चुकीचे नाही, असे मत मंत्री छगन भुजबळ सयांनी व्यक्त केले आहे.दरम्यान आगामी लोकसभा निवडणुकांसाठी महायुती सरकारकडून जागा वाटपासंदर्भात चर्चा सुरू आहे. दरम्यान, शिंदे गट आणि अजित पवार गट ठराविक जागांसाठी अडून बसल्याचे चित्र आहे. समसमान जागा वाटप व्हावे अशी मागणी अजित पवारांनी केली होती. यावरून, मंत्री छगन भुजबळ यांनी मोठे विधान केले आहे.अजित पवार आमच्या पक्षाचे प्रमुख आहेत. त्यामुळे त्यांनी जागावाटपांबाबत त्यांचे मत मांडलेले आहे. शिंदे गटाचे जेवढे जवळपास आमदार आले आहेत तेवढेच अजित पवार गटाचे आमदार आले आहेत. त्यामुळे सरासर विचार करता त्यांच्याप्रमाणे आम्हालाही न्याय मिळायला पाहिजे, असे मत मांडले तर चुकीचे नाही. ते मत बरोबर आहे, अशी भूमिका छगन भुजबळ यांनी मांडली आहे.टीका करायला चांगले शब्द सापडत नाहीत. चांगल्या शब्दांचा अभ्यास नसेल तर ते तसेच बोलतील. माणसाने सुसंस्कृत असले पाहिजे. थोडे शिक्षण कमी असले तरी चालते. कोणाला कसा मान-सन्मान द्यावा, यासाठी सुसंस्कृत असणे गरजेचे आहे, असा टोला छगन भुजबळ यांनी जरांगे यांना लगावला आहे.मंत्री छगन भुजबळ यांनी मनोज जरांगे यांच्या संस्कृतीविषयी वक्तव्य केले होते. त्यावरुन जरांगे यांनी भुजबळांना प्रत्युत्तर दिले. ते रुग्णालयातूनच बोलत असताना म्हणाले, सुसंस्कृतपणा तुमच्याकडून काय शिकायचा. भुजबळ साहेब तुम्ही सुधरा, नाहीतर तुम्हाला शॉक बसेल. शेवटी तुम्ही या राज्यातील एक अभ्यासू माणूस आहात. तुम्हाला झटका बसेल आणि बसला तर मला खूप टेन्शन येईल. मला खूप बेकार वाटत आहे.मराठा आरक्षणाच्या आंदोलनाचा चेहरा ठरलेल्या मनोज जरांगे पाटलांनी मंगळवारी पुन्हा एकदा राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्यावर निशाणा साधला आहे. मला बाबा धाकच बसला, त्या माणसाचा. आम्ही सुसंस्कृतपणा तुमच्याकडून का शिकावा भुजबळ? पाय तोडण्याची भाषा करणारे तुम्ही आम्हाला काय शिकवणार? तुमचे तुम्ही बघा, आम्ही आमचे पाहतो, असे ते म्हणालेत. यावेळी त्यांना मुंबईकरांना आंदोलनावेळी सहकार्य करण्याचेही आवाहन केले

# इंडीयन मेडीकल असोसिएशनच्या डॉक्टर्सचे 'शब्दशारदा' वैद्यक साहित्य संमेलन पुण्यात संपन्न

## सांस्कृतिक समितीचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांची माहिती

**पुणे । प्रतिनिधी**

इंडीयन मेडीकल असोसिएशन सांस्कृतिक समिती, महाराष्ट्र राज्य व पुणे आयएमएच्या वतीने केवळ डॉक्टर्ससाठी आयोजित 'शब्दशारदा' वैद्यक साहित्य संमेलन नुकतेच पुण्यात आयोजित करण्यात आले होते. महाराष्ट्रात पहिल्यांदाच केवळ डॉक्टर्स बांधवांसाठी अशा प्रकारचे साहित्य संमेलन भरविण्यात आले हे या संमेलनाचे खास वैशिष्ट्य ठरले.

इंडीयन मेडीकल असोसिएशनच्या सांस्कृतिक समिती व पुणे आयएमए शाखेच्या वतीने हे साहित्य संमेलन डॉ.नितू मांडके आयएमए हॉल येथे आयोजित करण्यात आले होते. अशी माहिती संघटनेचे सांस्कृतिक समितीचे महाराष्ट्राचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना दिली आहे. या साहित्य संमेलनाची सुरूवात ग्रंथदिंडीने करण्यात आली. या ग्रंथदिंडीचे उद्धाटन संघटनेचे अध्यक्ष डॉ.रविंद्र कुटे व सांस्कृतिक समितीचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी व्यासपीठावर डॉ.रविंद्र कुटे, डॉ.राजेश इंगोले, डॉ.सुधा कांकरिया, डॉ.श्रीकांत केळकर, डॉ.अविनाश भोंडवे, डॉ.राजू वारयाणी, डॉ.केदार पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना डॉ.राजेश इंगोले यांनी आपल्या अध्यक्षतेखाली विविध सांस्कृतिक कार्यक्रम गायन स्पर्धा, नृत्यस्पर्धा, छायाचित्र स्पर्धा, चित्रकला स्पर्धा अत्यंत उत्साहात पार पडल्यानंतर या साहित्य संमेलनाने त्यावर कळस




चढविला असल्याचे मत व्यक्त केले. महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशात प्रथमच हे वैद्यक साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. आणि या साहित्य संमेलनाला डॉक्टर्सचा हा प्रचंड उस्फुर्त प्रतिसाद लाभला ही माझ्या अध्यक्षतेला लाभलेली सोनेरी किनार आहे. ह्या सर्व यशाबद्दल माझ्या सांस्कृतीक समितीच्या सर्व सभासदांचे मी हार्दिक आभार मानतो व अभिनंदन करतो असे गौरवोद्गार काढले. हे साहित्य संमेलन इंडीयन मेडीकल असोसिएशनचे ऐतिहासिक संमेलन ठरल्याचे मत व्यक्त करीत या नंतरही असेच बहारदार कार्यक्रम संघटना आयोजित करेल असे आश्वासन दिले. पुढे बोलताना डॉक्टर्स म्हणजे साहित्य कळत नसलेला निवळच अरसिक माणूस अशी ढोबळमानाने अंदाज लावला जातो. पण, या साहित्य संमेलनात डॉक्टर्सचे जे दर्जेदार साहित्य आले आहे. त्यामुळे डॉक्टर्सची प्रतिभा किती क्षमतेची आहे हे कळते. तसेच साहित्य हे प्रत्यक्ष जीवनात उतरले पाहिजे असे मत व्यक्त करीत साहित्य हे मानवी मनाचे, जीवनाचे प्रतिबिंब असले पाहिजे असे मत व्यक्त करीत या साहित्य संमेलनाच्या आणि सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील डॉक्टर्सना आपल्या प्रतिभा, कला दाखवण्यासाठी हे सक्षम व्यासपीठ ठरल्याचे मत व्यक्त केले. यावेळी बोलताना डॉ.रवींद्र कुटे यांनी महाराष्ट्रच नव्हे तर देशात प्रथमच अशा प्रकारचे डॉक्टर्ससाठी साहित्य संमेलन आयोजित करण्यात आल्याबद्दल समितीचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले व कार्यक्रमाच्या संयोजिका डॉ.गितांजली शर्मा यांचे कौतुक व अभिनंदन केले. डॉक्टर्स हे कलाकार असतात, अभिनेते असतात, गायक असतात, चित्रकार असतात, छायाचित्रकार असतात, कवी असतात, कथाकार असतात आणि या प्रतिभाना डॉ.राजेश इंगोले आणि त्यांच्या सांस्कृतिक समितीने योग्य व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे असे गौरवोद्गार काढले. अशा प्रकारच्या कार्यक्रमांमुळे डॉक्टर्सच्या जीवनात असलेला दैनंदिन ताणतणाव कमी होऊन त्यांच्यात नविन ऊर्जा निर्माण होईल असे मत व्यक्त केले. डॉ.सुधा कांकरिया यांनी डॉक्टर्सचे वेगळे साहित्य संमेलन असू शकते आणि ते यशस्वी होऊ शकते हे या साहित्य संमेलनाच्या माध्यमातून इंडीयन मेडीकल असोसिएशनने दाखवून दिले आहे. प्रत्येक डॉक्टरने आपल्या रोजच्या दवाखान्याच्या आयुष्यातून बाहेर पडून असा एखादा छंद जोपासायला हवा असे मत व्यक्त केले. डॉ.श्रीकांत केळकर यांनी साहित्य क्षेत्राशी निगडित आपल्या आयुष्यातील वेगवेगळे प्रसंग मनोरंजक रितीने सादर केले. यावेळी डॉक्टर्स लिखित पुस्तक प्रकाशन सोहळा व साहित्य संमेलनाच्या निमित्ताने आयोजित कथा काव्य पुरस्कार सोहळा संपन्न झाला. यावेळी डॉ.शुभदा लोहिया आणि डॉ.निलेश नागरगोजे यांना कथा आणि काव्य लेखनात पुरस्कार मिळाल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. डॉ.अविनाश भोंडवे, डॉ.अजित वाडकर, डॉ.समीर, डॉ.भक्ती दातार, डॉ.शेखर कुलकर्णी, डॉ.इक्बाल मिन्ने, डॉ.सुहास नेने, डॉ.मंदार परांजपे यांनी विविध विषयांवर आपले विचार प्रदर्शित केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. गीतांजली शर्मा यांनी केले. तर उपस्थितांचे आभार डॉ राजेश इंगोले यांनी मानले.

## महाराष्ट्राला पुन्हा एकदा फसवलं:महाराष्ट्राचा अपमान किती दिवस सहन करायचा?–आदित्य ठाकरे

**मुंबई**–युवासेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांनी महाराष्ट्राला पुन्हा एकदा फसवलं असे ट्विट करत राज्य सरकारवर निशाण साधला आहे. गेल्या काही दिवसांपासून तयार प्रकल्पांचे लोकार्पण सरकार करत नसल्याचा आरोप आदित्य ठाकरे यांनी केला होता. आता पुन्हा एकदा युवासेना त्यांनाट्रान्स हार्बर लिंक आणि दिघा रेल्वे स्टेशनच्या उद्धाटनावरून ट्वीट करत सरकारला घेरले आहे.आदित्य ठाकरे यांनी ट्वीट करत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्यांच्या गटावर सडकून टीका केली आहे. ''२०२४ ला हे राज्य कोणाच्या हातात द्यायचे, राज्याचे भविष्य काय असणार आहे. बाजूच्या राज्याकडे आपले राज्य द्यायचे की गद्दार म्हणून ओळख असलेल्या चेल्यांच्या हातात'', असा सवाल त्यांनी उपस्थित करून शिंदे गटावर घणाघाती टीका केली आहे.महाराष्ट्राला पुन्हा एकदा फसवलं!



आज 'मुंबई ट्रान्स हार्बर लिंक' च्या उद्धाटनाची तारिख असेल असं मिडियात सांगितले होते, पण आता ते उद्धाटन पुन्हा पुढच्या वर्षावर ढकलले! ३ महिने तयार असूनही, मुंबई ट्रान्स हार्बर लिंकचे उद्धाटन नाही. ८ महिने तयार असूनही दिघा रेल्वे स्टेशनचे उद्धाटन नाही. कोणासाठी नेमके थांबवले आहे हे सगळं? असा सवाल आदित्य ठाकरेंनी केला आहे.सूरतचं डायमंड बोर्ज मात्र लगेच जगाला दाखवलं. वेदांता फॉक्सकॉन, एयरबस टाटा, डायमंड बोर्ज, मेडिकल डिव्हाईस पार्क, ४० गद्दार सगळं तिथे नेलं., हा आपल्या महाराष्ट्राचा अपमान किती दिवस सहन करायचा? २०२४ मध्ये तुम्ही ठरवा, आपल्या राज्याचं भविष्य आपण ठरवायचं की शेजारच्या राज्याने आणि गद्दार म्हणून ओळख असलेल्या त्यांच्या चेल्यांनी! असे म्हणत आदित्य ठाकरेंनी टीका केली आहे.आदित्य ठाकरेंनी याआधीही दीघा स्टेशन ८ महिन्यांपासून तयार असून त्याच उद्धाटन करायला या सरकारला वेळ नसल्याचे म्हणत टीका केली होती. तसेच, उरण रेल्वेलाइनही केवळ व्हीआपर्यींच्या अभावी प्रतीक्षेत असल्याचे आदित्य ठाकरेंनी म्हटले होते.

## दादांचा दरारा सर्वच जाणतात:त्यांनी तो केंद्रात दाखवावा आणि निर्यातबंदी तत्काळ उठवावी–कोल्हे

**मुंबई**–दादांचा दरारा सर्वांना माहित आहे. त्यांनी तो दरारा केंद्रात दाखवावा आणि ठामपणे सांगावे की आमचा शेतकरी संकटात आहे कांद्यावरील निर्यातबंदी तातडीने उठवा अशी टीका खासदार अमोल कोल्हे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर केली आहे. अमोल कोल्हे यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांची भेट घेतली. यावेळी ते बोलत होते.शिरूर लोकसभा मतदारसंघात मी महायुतीचा उमेदवार निवडून आणून दाखवणार असे अजित पवार यांनी म्हंटले होते. याबाबत बोलताना अमोल कोल्हे म्हणाले की, मी सर्वसामान्य मध्यमवर्गीय कुटुंबातील आहे. एवढ्या मोठ्या उंचीच्या नेत्याने मला आव्हान देणे ही माझ्यासाठी गौरवाची बाब आहे. दादा मोठे नेते आहेत. त्यांच्याविषयी नेहमीच आदर राहील. त्यांचे हे असे विधान असेल तर भेटून मी त्यांची भूमिका समजून घेईन'', असे अमोल कोल्हे म्हणाले.तसेच पुढे अमोल कोल्हे म्हणाले'' अजितदादा हे मोठे नेते आहेत. मी २०१९ मध्ये जिथे उभा होतो आजही २०२३ मध्ये तिथेच उभा आहे. त्यांनी भूमिका बदलली.



त्यांना कान धरण्याचा अधिकार होता मात्र सोबत होतो तेव्हाच त्यांनी माझे कान का धरले नाहीत?'' असे अमोल कोल्हे म्हणाले. तसेच शिरूर मतदारसंघात दादांनी पाहणी केली. यासाठी मी त्यांचा आभारी आहे. नागरिकांसाठी हा उड्डाणपूल खुला करावा अशी मागणी ६ महिन्यांपूर्वीच दादांकडे केली होती. आता अपेक्षा आहे की, आज त्यांनी पाहणी केल्यानंतर नागरिकांच्या सोयीचा निर्णय घेतला जाईल'', असे मत देखील अमोल कोल्हे यांनी व्यक्त केले आहे.दरम्यान, उद्यापासून ३ दिवस ३० डिसेंबरपर्यंत राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाकडून शेतकरी आक्रोश मोर्चा काढला जाणार आहे. याबाबत अमोल कोल्हे म्हणाले, शेतकऱ्यांच्या मुद्द्यावरील ६ प्रमुख मागण्या असतील. कांदा प्रश्न हा सर्वात प्रमुख मुद्दा असेल. तर ३० तारखेला जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात शरद पवार यांची सभा देखील होणार आहे. मविआ आघाडीच्या माध्यमातून हा मोर्चा होणार असल्याची माहिती अमोल कोल्हे यांनी दिली.तसेच ''खासगीत झालेली चर्चा सार्वजनिक केली जात नाही. वरिष्ठ नेत्यांसोबत माझी खासगीत चर्चा झाली होती. त्यांनी ती सार्वजनिक केली असली तरी माझ्यासारख्या लहान कार्यकर्त्याने ती सार्वजनिक करणे योग्य नाही. लोकशाहीमध्ये प्रत्येकाला ताकद दाखवण्याचा अधिकार असून निर्णय मात्र जनतेकडून घेतला जातो. शिरूर मतदारसंघातील जनतेत शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्याबद्दल कृतज्ञता'' असल्याचे अमोल कोल्हे यांनी यावेळी सांगितले.

## वीज कामगार महासंघ स. पतसंस्थेच्या व्हा. चेअरमनपदी किशोर साळवे यांची निवड

**पैठण । प्रतिनिधी**

महाराष्ट्र वीज कामगार महासंघ सहकारी पतसंस्थेच्या कार्यालयात पतसंस्थेच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष, मानद सचिव, खजिनदार पदांची निवडणूक पार पडली. अध्यक्षपदी गणेश दाभाडे तर किशोर साळवे यांची उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. सुहास निकम सचिव तर मुकिमखान पठाण यांची कोषाध्यक्षपदी निवड करण्यात आली. नवनियुक्त संचालक मंडळामध्ये वाणी सांडू भागाजी, साकळे नवनाथ, खरात संतोष नामदेवराव, मेटे विजय कडुबा, ताठे अण्णा तोताराम, शेळके कैलास विष्णू, बोराडे संदिप पंढरीनाथ, हातकंगणे ज्ञानेश्वर भागाजी, डोबाळ प्रेमसिंग रामलाल, जहागिरदार रेखा अरूण, भोसले सपना रविंद्र आदिंची निवड करण्यात आली. निवडणुक निर्णायक अधिकारी म्हणून देशमुख यांनी काम पाहिले. सदरील निवड प्रक्रिया दरम्यान संघटनेचे प्रदेश महामंत्री अरुण पिवळ, वरिष्ठ मार्गदर्शक आर. टी. जोशी, मैनाजी ठोंबरे, बाबुराव शिंदे, संघटनेचे प्रादेशिक अध्यक्ष तुषार भोसले, परिमंडळ अध्यक्ष दादाराव वाघमोडे, परिमंडळ सचिव वाल्मिक निकम, अभिजीत धर्माधिकारी, संजय दळवी, तसेच संभाजीनगर ग्रामीण चे सर्कल




अध्यक्ष पांडुरंग धांडे, विभागीय सचिव कैलास नेमाने, शहर मंडळ अध्यक्ष कृष्णा ताडे, पैठण तालुका अध्यक्ष दीपक कचरे, तालुका उपाध्यक्ष शिवनाथ घटे, तालुका सचिव अंगद वनवे, शंकर गाढेकर, शंकर करताडे, योगेश जाधव, रुपेश येवले, कृष्णा साळवे, राजेंद्र भाकरे, उद्धव ढेरे, अजित घोडके, अविनाश ढवळे, सुनील राऊत, ईश्वर भागवत, सतिश जाधव, कृष्णा आगळे, ईश्वर सोनवणे, ज्ञानेश्वर टोकशा आदिंसह पतसंस्थेचे मावळते संचालक मंडळ, पतसंस्थेचे सभासद, संघटनेचे पदाधिकारी, सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महाराष्ट्र राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत सोतोकान कराटे संघाचे येश

**परतूर । प्रतिनिधी.**

हिंगोली जिल्हा स्पोर्ट्स कराटे डो असोसिएशन च्या वतीने,महाराष्ट्र रेफरी,से.संतोष कांबळे,से.गोपाल ईसावे,से.विजयकुमार आडे,शिहान - योगेश चव्हाण,व स्पर्धा अयोजक,से.विजय ठोंबरे यांनी दि.२४/१२/२०२३ रोजी डोंगरकडा ता.कळमनुरी येथील नवजीवन मंगलकार्यालय येथे सहावी महाराष्ट्र राज्यस्तरीय कराटे स्पर्धेचे अयोजन करण्यातआले होते.या स्पर्धेत सात जिल्ह्यातील विध्यार्थ्यांनी व परतूर येथील सोतोकान कराटे डो इंडिया संघाने सहभाग घेतला होता.यावेळी सोतोकान कराटे च्या विध्यार्थ्यांनी चांगली कामगिरी करत व मेडल,बेस्ट टिम ट्रॉफी,प्राप्त केली आहे. यावेळी परतूर कराटे चे विध्यार्थी पुर्वा मँकेवार,राबीया सिद्दीकी,विश्वांजली गव्हाणे,स्वरा खुळे,श्रेया राठोड,तंजीला पठाण,ऋषीकेश गव्हाणे,अभिषेक पावले,अश्विन आखाडे,धुव सावंत,श्रेयश राठोड,रेहान शेख,शे.मोहम्मद मलिक,अझलान शेख,यांचा सहभाग होता. या यशामागे सातत्याने



मार्गदर्शन करनारे सोतोकान कराटे परतूर चे कराटे मास्टर माणिक जैस्वाल.व कराटे संघाचे विध्यार्थ्याचें पालकांच्या वतीने अभिनंदन करण्यातआले.





चित्रपटसृष्टीतील गायक व संगीतकार कलावंत गौरव चाटी यांनी आज भद्रावती येथील गुरूमाऊली स्टोअर ला भेट दिली. यावेळी शरद लांबे, अनंत मते,सुनील वैद्य,प्रकाश आस्वले,रवी भोयर,रमेश गुंडावार, श्रीरंग वाढई, रामदास नवघरे, मधुकर धात्रक, शंकर शेंडे, पंढरी राजूरकर, रंगराव येसेकर आदी भद्रावतीकरांनी त्याचा गौरव केला. गौरव यांनी मराठी फिल्म काटा छापा, हिरकणी,गदर २ ना संगीत दिले आहे.माजी पंतप्रधान अटलजींवर येणाऱ्या आगामी सिनेमात संगीतकार व गायक म्हणून काम करतो आहे.

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज चंद्रपुरात

**चंद्रपूर**–मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे २७ डिसेंबर रोजी चंद्रपूर शहरात आगमन होणार असून ते ६७ व्या राष्ट्रीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धेचे उद्धाटन समारंभाला उपस्थित राहणार आहे.मुख्यमंत्री शिंदे यांचे सायंकाळी ४.४५ वाजता मोरवा विमानतळ येथे आगमन होईल. त्यानंतर सायंकाळी ५.३० वाजता राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेच्या उद्धाटन कार्यक्रमाला तालुका क्रीडा संकुल बल्लारपूर येथे ते उपस्थित राहतील. सायंकाळी ६.३० वाजता बल्लारपूर येथून नागपूरकडे प्रयाण करतील.



# सांस्कृतिक मेजवानीने रंगणार राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेचा उद्घाटन सोहळा

## मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्या उपस्थितीत होणार भव्यदिव्य शुभारंभ





**चंद्रपूर । प्रतिनिधी**

'मिशन ऑलिम्पिक २०३६' हे एकच ध्येय डोळ्यांपुढे ठेवून राज्याचे वन, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूरचे पालकमंत्री ना. श्री. सुधीर मुनगंटीवार यांच्या संकल्पनेतून बल्लारपूर तालुका क्रीडा संकुलात ६७व्या राष्ट्रीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धा होत आहेत. यासाठी मा. ना. मुनगंटीवार यांनी प्रशासनाकडून सूक्ष्म नियोजन करून घेतले आहे. उद्घाटन सोहळा सांस्कृतिक मेजवानीचे रंगणार असून स्पर्धेदरम्यान विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे दर्शन खेळाडूंना घडणार आहे. २७ डिसेंबर २०२३ रोजी सायंकाळी ५.३० वाजता राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, क्रीडा मंत्री संजय बनसोडे, पालकमंत्री ना. श्री. सुधीर मुनगंटीवार व मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

शुभारंभ समारंभात फायर शो, लेझर शो, क्रोबॅटिक डान्ससह विविध सांस्कृतिक कार्यक्रम मुख्य आकर्षण राहणार आहे. २७ ते ३१ डिसेंबर २०२३ या कालावधीत बल्लारपूर येथे होणाऱ्या क्रीडा स्पर्धेच्या निमित्ताचे चंद्रपूर व बल्लारपूर नगरीचा चेहरामोहरा बदलला आहे. विविध चौकांचे सौंदर्यीकरण करण्यात आले आहे. विविध संकल्पनावर आधारित रंगबेरंगी चित्रांनी भिंती फुलल्या आहेत. अखिल भारतीयस्तरावरील या स्पर्धेसाठी चंद्रपूरनगरी सज्ज झाली आहे.

**शाल्मली खोलगडे गाणार 'लाइव्ह'**

मुख्य उद्घाटन सोहळ्यात २७ डिसेंबर २०२३ रोजी सायंकाळी ६.३० वाजता प्रसिद्ध सिनेगायिका शाल्मली खोलगडे यांचा लाइव्ह संगीत परफॉर्मन्स आयोजित करण्यात आला आहे. यासोबतच फायर शो, लेझर शो, अक्रोबाईट डान्स आणि ढोल ताशांचा गजर करण्यात येणार आहे.

**'एक शाम खिलाडीयों के नाम'**

२८ डिसेंबरला सायंकाळी ६.३० वाजता गीत आणि नृत्याचा समावेश असलेल्या 'एक शाम खिलाडीयों के नाम' या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यात पार्श्वगायक मोरेश्वर निस्ताने, श्रुती जैन (सूर नवा ध्यास नवा फेम), स्वस्तिका ठाकूर (कलर्स रायजिंग फेम) व सागर मधुमटके, संगीत संयोजन पंकज सिंग व नृत्य दिग्दर्शन सचिन डोंगरे हे कलाकार सहभागी होतील.

**शिववंदना, महाराष्ट्राची लोकधाराही वेधणार लक्ष**

महाराष्ट्राच्या लोक संस्कृतीचे दर्शन घडविणारा, शिववंदना व महाराष्ट्राची लोकधारा हा सांस्कृतिक कार्यक्रम २९ डिसेंबरला सायंकाळी ६.३० वाजता होणार आहे. यात सुमारे ३०० लोककलावंत सहभागी होणार आहेत. महाराष्ट्राची विविध संस्कृतीचे दर्शन या कार्यक्रमातून घडेल. गणेशवंदना, जागर गोंधळ, शाहिरी, भक्ती-शक्ती संगम, कोळी नृत्य व शिवराज्यभिषेक सोहळ्याचे सादरीकरण यावेळी उपस्थिताना पाहता येईल.

**'कलर्स ऑफ इंडिया'चीही क्रेझ**

३० डिसेंबरला ३५० कलाकार देशातील विविध राज्यांच्या संस्कृतीचे दर्शन घडविणारा सांस्कृतिक कार्यक्रम सादर करतील. भव्यदिव्य स्वरूपात होणाऱ्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी 'थीम साँग' तयार करण्यात आले आहे. या गाण्याला प्रसिद्ध पार्श्वगायक कैलाश खेर यांनी स्वर दिला आहे. 'आओ चंद्रपूर, खेलो चंद्रपूर... खेलो ऐसा दिल लेलो चंद्रपूर...' असे शब्द असलेले हे गीत विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाची पेरणी करणारे ठरत आहे. लक्षवेधक शब्द, जोशपूर्ण संगीत आणि कैलाश खेर यांचा भावगर्भित आवाज हे या 'थीम साँग'ची वैशिष्ट्य ठरत आहे. प्रसिद्ध अभिनेते सलमान खान आणि आमिर खान यांनी स्पर्धेसाठी शुभेच्छा संदेश प्रसारीत केले आहेत.

# शाळा परिसरातील तंबाखू विक्रेत्यांवर सक्त कारवाई करा-जिल्हाधिकारी

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

शाळेच्या १०० मीटर परिसरात तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करणाऱ्यांवर सक्त कारवाई करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी दिल्या आहेत. तसेच विक्रीस मनाई करण्यात आलेल्या सुगंधित तंबाखूचा साठा जप्त करून संबंधीतांवर कारवाई करण्यासाठी विशेष मोहिम राबविण्याचे निर्देश आरोग्य विभागाला दिले आहेत.

राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत तंबाखू समन्वय समितीची सभा जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली २६ डिसेंबरला घेण्यात आली. याप्रसंगी जिल्हाधिकारी गौडा यांनी वरील आदेश दिले. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे, पोलिस उपअधिक्षक राधिका फडके, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अशोक कटारे, शिक्षणाधिकारी (प्राथमीक) राजकुमार हीवरे, आरोग्य विभागाच्या जिल्हा सल्लागार



डॉ. श्वेता सावलीकर उपस्थित होते.जिल्हाधिकारी यांनी यावेळी सिगरेट व अन्य तंबाखूजन्य पदार्थ नियंत्रण कायद्यांतर्गत विविध बांबींचा आढावा घेतला. कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाईसाठी विशेष मोहिमेंतर्गत पोलिस व शिक्षण विभागाची मदत घेण्याचे त्यांनी सांगितले. यावेळी मनपाचे वैद्यकीय अधिकारी डॉ.वनिता गर्गेलवार, डॉ.नयना उत्तरवार, शिक्षण विभाग समग्रचे समन्वयक सुर्यकांत भडके, उपशिक्षणाधिकारी निखीता ठाकरे, अन्न सुरक्षा अधिकारी जी. शी. सातकर, स्थानिक गुन्हे शाखेच्या अपर्णा मानकर व संबंधीत अधिकारी उपस्थित होते.

# नक्षलग्रस्त भागातील शिक्षण व आरोग्य सुविधांवर निधी खर्चास प्राधान्य-जल्हाधिकारी विनय गौडा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

नक्षलग्रस्त भागाच्या विकासासाठी प्राप्त होणाऱ्या निधीपैकी ७५ टक्के निधी अतिसंवेदनशील तालुक्यासाठी वितरीत करावा व त्यात शिक्षण, आरोग्य व पिण्याच्या पाण्यावर प्राधान्याने खर्च करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी विनय गौडा. जी.सी. यांनी दिल्या.नक्षलग्रस्त भागाच्या विकासासाठी विशेष कृती कार्यक्रमांतर्गत निधी खर्चाचा आढावा जिल्हाधिकारी यांनी आज घेतला. याप्रसंगी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, उपवनसंरक्षक श्वेता बोड्डू, जिल्हा नियोजन अधिकारी राजू कळमकर, पोलिस उपअधिक्षक राधिका फडके, शिक्षणाधिकारी (प्राथमीक) राजकुमार हीवरे प्रामुख्याने उपस्थित होते.चंद्रपूर जिल्ह्यातील एकूण नऊ तालुके नक्षलग्रस्त



भागात येतात. यात जिवती, राजूरा, कोरपणा व गोंडपिंपरी हे तालुके अतिसंवेदनशील असून चंद्रपूर, बल्लारपूर, पोंभूर्णा, मूल व सावली हे तालुके नक्षल प्रभावीत संवेदनशील तालुके आहेत. या भागातील विकासासाठी विशेष कृती कार्यक्रमांतर्गत उर्वरित निधीच्या मागणीसाठी पाठपूरावा करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी यांनी दिल्या.बैठकीला संबंधीत विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# बीडमध्ये ३१ डिसेंबर पासून राज्यस्तरीय कीर्तन महोत्सव



**बीड । प्रतिनिधी**

गत २० वर्षापासून स्व. झुंबरलालजी खटोड सामाजिक प्रतिष्ठान निःस्वार्थपणे संत वचन जनसामान्यांपर्यंत पोहचविण्याचे कार्य करत आहे. या वर्षी सुध्दा ३१ डिसेंबर २०२३ ते १० जानेवारी २०२४ या कालावधीत सांप्रदायिक कीर्तने, कथा, प्रवचन, भारुड अशा विविध भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती प्रतिष्ठानच्यावतीने देण्यात आली.

शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात हा महोत्सव संपन्न होणार आहेत. बीडकर भाविकांनी सहकुटूंब सहपरिवार उपस्थित राहून अध्यात्मिक विचार अंगीकारावेत असे आवाहन करण्यात आले आहे. खटोड प्रतिष्ठानच्यावतीने मागील २० वर्षापासून मावळत्या वर्षाला निरोप आणि नवीन वर्षाचे स्वागत अध्यात्मिक विचारांनी करण्यासाठी हा महोत्सव आयोजित केला जातो. आज पर्यंत महाराष्ट्रासह देशाच्या विविध भागातील कीर्तनकारांनी आपली सेवा देत कीर्तनाच्या माध्यमातून सर्व संतांचे विचार बीडकरांपर्यंत पोहचवले आहेत.

या महोत्सवाने बीडचे नाव राज्यभरात पोहचले. कीर्तनकारांबरोबरच देशपातळीवर कार्य करणारे विविध क्षेत्रातील मान्यवर, मंडळी यांनी या महोत्सवात उपस्थिती दर्शवून त्यांचे विचार व्यक्त करत अध्यात्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक प्रबोधन केले.

खटोड प्रतिष्ठानने महोत्सवाच्या माध्यमातून सामुदायिक विवाह सोहळ्याची चळवळ निर्माण केली. त्याबरोबरच मुलींचा सामुदायिक नामकरण सोहळा, विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन, शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी कॉपीमुक्तीची चळवळ या सारखे शैक्षणिक आणि सामाजिक उपक्रमही प्रतिष्ठानने मागील २० वर्षात राबवले. यातील अनेक उपक्रमांची नोंद वंडर बुक ऑफ रेकॉर्डने घेतली हे विशेष. तरुणांमध्ये अध्यात्मिक विचारांची रुजवणूक व्हावी आणि भारतीय संस्कृतीची मूल्य आणि परंपरा पुढेही अविरत सुरु रहाव्यात या उदात्त हेतूने विचारांचे गांभीर्य करण्या बरोबरच अध्यात्मिक विचारांची रुजवणूक करण्यासाठी हा महोत्सव संपन्न होत असून यंदा ३१ डिसेंबर ते १० जानेवारी या कालावधीत शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात हा महोत्सव संपन्न होणार आहेत. बीडकर भाविकांनी सहकुटूंब सहपरिवार उपस्थित राहून अध्यात्मिक विचार अंगीकारावेत असे आवाहन करण्यात आले.

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेच्या २०२३ च्या वार्षिक विशेषांकाचे ऊर्जानगरात विमोचन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे मुखपत्र असलेल्या अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेच्या वार्षिक विशेषांक २०२३ चे विमोचन चंद्रपूर जिल्हा व ऊर्जानगर शाखेच्या वतीने महाराष्ट्र अंनिस चंद्रपूरचे जिल्हाध्यक्ष सूर्यकांत खनके यांच्या मार्गदर्शनाखाली कामगार मनोरंजन केंद्र ऊर्जानगर चंद्रपूर येथे डॉं. संगिता बोदलकर वैद्यकीय अधिक्षक चंद्रपूर महाऔष्णिक विज केंद्र दवाखाना, जिल्हा कार्याध्यक्ष पी एम जाधव, मा.नरेंद्र रहाटे सर उपाध्यक्ष राज्य गुणवंत कामगार असोसिएशन तथा कामगार नेते यांचे हस्ते तसेच जिल्हा प्रधान सचिव नारायण चव्हाण साहेब,कविता नवघरे जिल्हा महिला सह कार्यवाहक तसेच ऊर्जानगर शाखेचे अध्यक्ष मुरलीधर राठोड, कार्याध्यक्ष देवराव कोंडेकर प्रधान सचिव,विजय राठोड यांच्या उपस्थितीत करण्यात आले.यावेळी डॉं संगीता बोदलकर यांनी समाजातील अंधश्रद्धा आणि खास करून



घरच्या महिला या अंधश्रद्धेला कशा बळी पडतात यावर विस्तृत मार्गदर्शन करून अंनिस शाखा ऊर्जानगरच्या कार्याचे अभिनंदन केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन देवराव कोंडेकर यांनी केले ,प्रास्ताविकेतून सदर विशेषांकाचे महत्व नारायण चव्हाण यांनी विशेद केले तर आभार मुरलीधर राठोड यांनी मानले यावेळी अंनिस ऊर्जानगरचे पदाधिकारी बाळकृष्ण सोमलकर, दुरेंद्र गेडाम ,संजय जुनारे, शंकर दरेकर,तुषार चव्हाण,मनोज रायपुरे,सुजित जुनगरे, मनोजकुमार चहांदे, सुरेश निमकर्डे व अन्य सभासद यांची उपस्थिती होती.

# ना.सुधीरभाऊ मुनगंटीवार सेवा केंद्र घुग्घुसतर्फे ख्रिश्चन बांधवांना शीतजलाचे वितरण

**घुग्घुस । प्रतिनिधी**

येथील न्यु अपोस्टोलिक चर्चतर्फे ख्रिसमसनिमित्त भव्य शोभायात्रा रविवार, २४ डिसेंबर रोजी दुपारी शहरातून काढण्यात आली.शोभायात्रा ना. सुधीरभाऊ मुनगंटीवार सेवा केंद्रा जवळ येताच शोभायात्रेत सहभागी ख्रिश्चन बांधवांचे भाजयुमो प्रदेश उपाध्यक्ष विवेक बोढे यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले तसेच शितल जलाचे वाटप करण्यात आले.न्यु अपोस्टोलिक चर्च येथून शोभायात्रा काढण्यात आली. ख्रिश्चन समाज बांधवांनी ठिकठिकाणी दोन मिनिट थांबून लड्डू वाटप केले, प्रार्थना करून गीत गाण्यात आले व शुभ समाचार देण्यात आला. शोभायात्रा




नवीन बसस्थानक, पोलिस ठाणे, जुना बसस्थानक मार्गे मार्गक्रमण करीत न्यु अपोस्टोलिक चर्च येथे शोभायात्रेचे समापन करण्यात आले.यावेळी पास्टर रमेश नातर, वेलसली कलगूर, संदीप आरमुल्ला, येसूदास आरमुल्ला, देविदास चिलका, माजी जि.प. सभापती नितु चौधरी, माजी सरपंच संतोष नुने, प्रयास सखी मंच घुग्घुसच्या अध्यक्षा किरण बोढे, माजी जि.प. सदस्य चिन्नाजी नलभोगा, माजी ग्रामपंचायत सदस्या कुसुम सातपुते, काँग्रेस अल्पसंख्यक जिल्हा उपाध्यक्ष सुनील सिलका, चर्च कमेटीचे कोषाध्यक्ष रवी डिकोंडा, सचिव सुदर्शन आरमुल्ला, युथ अध्यक्ष रोहित आरमुल्ला, सचिव प्रणय लिंगम्पेल्ली, सदस्य लड्डू सिलका, चंटी आरमुल्ला, रोशन माडगूल, आशिष गुंडेटी, लक्की तक्कला, सचिन तांड्रा, जॉय तांड्रा, अनुराग नातर व समाज बांधव उपस्थित होते.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .